दैनिक गोदातीर दि. 16/02/2023

दैनिक गोदातीर



गोदातीर समाचार

16/02/2023

# गावठी पिस्टल आणि तलवारीसह दोन आरोपींना अटक

## ग्रामीण पोलिसांची कारवाई



**नवीन नांदेड-** तलवार व पिस्टलचा वापर करून मारहाण करणाऱ्या दोन गुन्हेगारांना ग्रामीण पोलीस ठाण्याच्या पथकाने अटक केली आहे. या आरोपींकडून तलवार, पिस्टल व खंजर जप्त करण्यात आले आहे. त्यांच्याकडून अनेक गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे.

सिडको भागातील गोविंद कॉलनी येथील रहिवासी मनप्रितसिंघ ऊर्फ तेजीसिंघ चरणसिंघ टाक यांनी ४ फेब्रुवारी रोजी ग्रामीण ठाण्यात तक्रार दिली. तक्रारीत म्हटले आहे की, ३ फब्रुवारी रोजी रात्री दहा वाजता सुमारास वसंतराव नाईक महाविद्यालयाच्या पाठीमागे मोकळ्या जागेत अविनाश ऊर्फ भैया माधवराव मिरासे, साईसिंह ऊर्फ लाला दिपकसिंह गहरवार, शुभम वाघमारे, शंकर एडके, सुरज यादव, इतर एक (सर्व रा. सिडको) यांचेतील साईसिंघ ऊर्फ लाला याने मनप्रितसिंघ यांना 'संभाजी चौक में मेरेको क्यु घुरके देख रहा था', असे म्हणुन त्यांच्या सोबत वाद घालुन त्याचा साथीदार शंकर एडके याने मनप्रितसिंघ यांच्या पाठीमागुन लाथ मारली. त्यांना पकडुन ठेवले असता साईसिंहने त्याच्या जवळील छऱ्याचे पिस्टल काढून मनप्रितसिंघ यांना धाक दाखवुन हावेत फायर केले. त्याच्या जवळील खंजरने 'तेरेको देखाता', असे म्हणुन मनप्रितसिंघचा जिवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्या गळ्यावर वार करत असताना तो वार दोन्ही हातांनी मनप्रितसिंघ यांनी आडवला. तसेच आरोपी अविनाश मिरासे याने त्याचेजवळील तलवार काढुन मनप्रितसिंघ यांना जिवे मारण्याचे उदेशाने त्यांच्या डोक्यावर वार करत असताना तो वार दोन्ही हातांनी अडवला तेव्हा त्यात त्यांच्या दोन्ही हातांना गंभीर दुखापत झाली. आरोपी शुभम वाघमारे याने त्याचे जवळील तलवारीने मनप्रितसिंघ यांच्यावर वार करत असताना त्यांनी हातांनी अडवले आहेत. तेव्हा साईलाला याने त्याचे जवळील खंजरने मनप्रितसिंघ यांच्या समोरुन दोन्ही पायावर व छातीवर वार केले. रितेश यादवने त्याच्या जवळील खंजरने मनप्रितसिंघ यांच्या पाठीमागील बाजुस मांडीवर गंभीर करुन जिवे मारण्याचा प्रयत्न केला. मेला असे समजुन हे सर्व जण निघुन गेले, असेही तक्रारीत म्हटले आहे. यावेळी मनप्रितसिंघ हे रक्तभंबाळ होवुन बेशुद्ध अवस्थेत पडले होते. त्यानंतर दुसऱ्या दिवशी मनप्रितसिंघ यांना सरकारी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले. याप्रकरणी मनप्रितसिंघ यांच्या फिर्यादीवरून ग्रामीण ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. याप्रकरणाचा तपास पोलीस उपनिरीक्षक विजय पाटील यांचेकडे देण्यात आला.

आरोपीचा शोध घेण्यासाठी दोन टिम तयार करुन रवाना करण्यात आली.

६ फेब्रुवारी रोजी सदर गुन्हयातील आरोपीतांपैकी आरोपी अविनाश मिरासे व साईसिंह गहेरवार या दोघांना ताब्यात घेण्यात आले. आरोपींच्या ताब्यातून तलवार, पिस्टल व खंजर जप्त केले. सदर आरोपी हा खऱ्या दिसणाऱ्या पिस्टल सारखी छऱ्याची पिस्टल जवळ बाळगुन त्याचा हावेत मोठा आवाज करून धाक दाखवत होता. या पिस्टलाचा वापर करून जनसामान्यांमध्ये भितीचे वातावरण तयार करून त्याचे ध्येये साध्य करत होता. दिनांक १५ फेब्रुवारी रोजी न्यायालयाने सदर आरोपीतांना एमसीआर केल्याने त्यांना जिल्हा कारागृह येथे पाठविण्यात आले.